पुणे । रविवार, १ फेब्रुवारी २०२६
महाराष्ट्र टाइम्स

# संवाद



ADVERTORIAL, ENTERTAINMENT PROMOTIONAL FEATURE

**ललितागौरी कुलकर्णी**
mtedit@timesofindia.com

**युरोपियन समुदायाशी केलेल्या मुक्त व्यापार कराराकडे जग आदराने बघत आहे. आरोप-प्रत्यारोप आणि समाज-माध्यमांमधून केलेल्या बेजबाबदार वक्तव्यांनी आशंकित झालेल्या सध्याच्या जागतिक आर्थिक वातावरणात ही 'मदर ऑफ ऑल डील्स'ची घोषणा भारत आणि इतरांसाठीही चांगली ऊर्जा निर्माण करते आहे.**

# उघडले पश्चिमेचे मुक्त व्यापारद्वार



भारत आणि युरोपीय समुदाय (ईयू) यांच्यातील बहुप्रतीक्षित मुक्त व्यापार करार २७ जानेवारी रोजी झाला. या करारावर जगभरातून प्रतिक्रिया उमटली. कॅनडाच्या प्रतिनिधींनी, 'अमेरिकेचे टॅरिफ अस्त्र भारताने निष्प्रभ केले आहे, आम्हीही इथून पुढे भारतीय आर्थिक परराष्ट्र धोरणाचे अनुकरण केले पाहिजे,' अशी प्रतिक्रिया जाहीरपणे मांडली. दोघांचे भांडण आणि तिसऱ्याचा लाभ या न्यायाने भारताचे आंतरराष्ट्रीय धोरण आज बदलत्या परिस्थितीचा आत्मविश्वासाने लाभ घेण्यासाठी हुशारीने तयार आहे. काय आहे हा जगभर गाजत असलेला भारत युरोप मुक्त व्यापार करार? आणि सर्व सामान्य भारतीयांसाठी त्यात नक्की काय असेल?

मुक्त व्यापार करार दोन देश किंवा प्रदेशांमधल्या आंतरराष्ट्रीय देवाणघेवाण, व्यापार, आणि स्थलांतर यावरील करार व इतर बंधने नाहीशी करून या व्यवहारासाठी पूरक असे वातावरण निर्माण करतो. अर्थशास्त्राप्रमाणे प्रत्येक देशाची उत्पादनक्षमता वेगवेगळी असल्याने वस्तू, सेवा, कामगार, तंत्रज्ञान यांची आंतरराष्ट्रीय देवाणघेवाण सगळ्यांच्याच हिताची ठरते. कोणत्याही एका देशाने इतरांकडून होणाऱ्या आयात-निर्यातीवर बंधने लादली तर त्यातून अनेक अडथळे निर्माण होऊन अखेरीस फायदा होत नाही. परंतु परदेशी तयार मालाच्या आयातीमुळे देशातल्या उत्पादकांना स्पर्धेला तोंड द्यावे लागून देशांतर्गत उत्पादन, रोजगार यावर परिणाम होईल या भीतीने प्रत्येक देश आयातीवर बंधने आणि शुल्क लावण्याचे धोरण अनुसरतो. आज आयातशुल्क केवळ आर्थिक धोरण राहिले नसून त्याचा दुसऱ्या राष्ट्राचे परराष्ट्र धोरण न पटल्यास त्यावर सूड घेण्यासाठी वापरण्याची बालिश प्रथा अमेरिकेने पाडली आहे. आयात शुल्क लादण्याचे ठरवल्यानंतर त्याबाबतचे धोरण निश्चित होऊन ते अमलात येऊन त्याचे प्रत्यक्ष परिणाम दिसण्यासाठी खरे म्हणजे वेळ लागतो. वेगवेगळ्या देशांच्या कंपन्यांमध्ये आधीपासून झालेले वस्तू-सेवांचे खरेदी विक्रीचे करार, त्यांच्या दर व तरतुदी यामध्ये तातडतोब बदल घडणे शक्य नसते. अमेरिकेने सध्या भारतातून निर्यात होणाऱ्या मालावर जगातील सर्वात जास्त सरासरी आयातशुल्क ५० % लादले आहे; पण त्याचबरोबर अमेरिकेतून आयात झालेला कच्चा माल तंत्रज्ञान असल्यामुळे प्रत्यक्षात निव्वळ आयातशुल्क ३८% आहे. हे देखील अतिशय जास्त असले तरी त्याहीपेक्षा ५००% आयातशुल्क लादण्याच्या उठसूठ दिलेल्या धमक्यांमुळे जी अस्थिरता आणि गोंधळाची परिस्थिती निर्माण होते ती देशांच्या उद्योग धंद्यासाठी जास्त धोकादायक ठरते. त्यामुळे या गोंधळाच्या परिस्थितीला शह देण्यासाठी नवीन परराष्ट्र धोरण भारताने चोखाळले आहे.

**■ युरोप-भारत मुक्त व्यापार करार**

भारतासाठी याप्रकारचे करार नवीन नाहीत. भारताने असे १३ मुक्त व्यापार करार याआधी दक्षिण आशियाई देश (सार्क) आणि आग्नेय आशियाई (आसियान) देशांबरोबर केलेले आहेत आणि गेल्या दशकात या करारांमुळे या प्रदेशांमधील भारताची निर्यात कैकपटीनी वाढली आहे. तसे पाहिले तर भारत-युरोप व्यापार नाते अमेरिकेच्या जन्माच्याही आधीचे. प्राचीन काळापासूनचे. अगदी ग्रीक, रोमन, पोर्तुगीज साम्राज्यापासूनची देवाणघेवाण असलेले. अमेरिकेशी व्यापार भारताच्या स्वातंत्र्यानंतर सुरू झाला. त्याचा इतिहास १९६० साली भारतात भीषण अन्नदुष्काळ असताना अमेरिकेने भारतात निर्यात केलेल्या, जनावरांच्या चाऱ्यासाठी वापरण्याच्या निकृष्ट दर्जाच्या 'पी- एल ४८०' गव्हाच्या प्रकरणाने झाकोळलेला. मग आताच्या युरोपशी केलेल्या करारात असे काय विशेष आहे ज्यामुळे त्याला 'मदर ऑफ ऑल डील्स' अस म्हटलं जात आहे?

**■ लघु-मध्यम उद्योग क्षेत्र, रोजगार निर्मिती आणि तंत्रज्ञान आयात**

या करारामुळे भारतातून युरोपला होणाऱ्या ९० % निर्यातीसाठी शुल्क संपूर्ण माफ झाले आहे. इतकेच नव्हे ही शुल्कमाफी तत्काळ अमलात येणार आहे. यात सर्व लघु-मध्यम क्षेत्रातील उद्योग, कापड उद्योग, दागिने, चामड्याच्या वस्तू व चप्पल उद्योग, खेळणी, इत्यादींचा समावेश आहे. या उद्योगांवर आधी ४% ते २६.५% इतके निर्यात शुल्क होते. त्यामुळे याचा मोठा परिणाम या सर्व वस्तूंची युरोपमधील मागणी वाढेल आणि लघुउद्योजकांबरोबरच त्यातील श्रमिक, इतर सेवा पुरवणाऱ्या क्षेत्रातील कामगार यांना रोजगार मिळण्यासाठी याचा उपयोग होईल.

या कराराआधीच २०२४-२५ मध्ये भारताची युरोपियन देशांना निर्यात ११.५ लाख कोटी रुपयांच्या (१३७ अब्ज डॉलर्स) घरात होती. या करारानंतर जवळजवळ २७ ट्रिलियन डॉलर्सची बाजारपेठ दोन्ही बाजूंसाठी खुली होईल. एवढेच नव्हे तर शेतीक्षेत्रातील पोल्ट्री, उद्योग, भाज्या, फळे यांची उत्पादने अशा उद्योगांसाठी या करारामुळे युरोपमधील बाजारपेठेत भारतीय मालाला प्राधान्य मिळणार आहे. याचा लघुउद्योग क्षेत्र आणि रोजगार निर्मितीवर होणारा लाभ अनन्यसाधारण असेल.

संवाद ▶ पान...४

➤ पान १ वरून

# उघडले पश्चिमेचे मुक्त व्यापारद्वार

**याबरोबर** भारतातील चहा, मसाले, भाज्या, फळे यांच्यावर प्रक्रिया केलेले पदार्थ उत्पादने युरोपमध्ये लोकप्रिय आहेत. त्यांच्या निर्यातीतून शेतीमालासाठी मूल्यवर्धन होऊन शेतीक्षेत्राला फायदा होईल. निर्यात निर्बंध कमी झाल्याने सुटसुटीतपणा आल्यामुळे या निर्यातप्रवण उद्योगासाठीची सरलता 'इज ऑफ डुइंग बिझनेस' सुधारून उद्योजकांना प्रोत्साहन मिळेल.

**■ सुशिक्षित युवकांसाठी सुवर्णसंधी**

मसाले, हस्तकला, हातमाग याबरोबरच आधुनिक भारत जगभरात सुशिक्षित कसबी उच्चशिक्षित सेवांच्या म्हणजेच मध्यमवर्गीय सॉफ्टवेअर इंजिनीअर्स, डॉक्टर्स यांच्या निर्यातीसाठी जगप्रसिद्ध आहेच. परंतु, यावर्षी नवीन पिढी याआधीच अमेरिकेची वाट सोडून इतर देशांमधील संधी चोखाळू लागली होती. या पिढीसाठी हा करार म्हणजे पर्वणीच आहे. या कराराद्वारे सेवा क्षेत्रातील भारतीय कंपन्यांसाठी युरोपियन बाजारात सुनिश्चित प्रवेश, डिजिटल सेवा, वित्तीय सेवा याच्यावर भर आणि व्यावसायिकांच्या युरोपियन देशांमधील येण्याजाण्यासाठी सुलभ व्हिसा इत्यादीमुळे भारत-ईयू सेवा निर्यातीत मोठी वाढ अपेक्षित आहे. या करारामुळे भारतीय उच्च-तंत्र सेवा निर्यातीला चालना मिळेल, तर ईयू व्यवसायांना भारतात गुंतवणूक व नाविन्यपूर्ण सेवा देण्यासाठी स्थिर व विश्वासार्ह वातावरण मिळेल. त्यानुसार युरोपमधल्या ३७ प्रमुख आणि त्यातील १४४ समाविष्ट क्षेत्रांमध्ये भारतीय कंपन्यांना त्यांच्या सेवा देण्यासाठी मुभा मिळणार आहे. याशिवाय स्वतंत्र व्यावसायिकांना देखील १७ क्षेत्रांमध्ये युरोपमध्ये व्यवसायसंधी मिळेल यात इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, उच्च शिक्षण, संशोधन इत्यादी क्षेत्राचा समावेश आहे. लघुउद्योग, शेती आणि व्यवसायिक सेवा आणि शिक्षण यासाठी हा मुक्त व्यापार करार म्हणजे मुक्तद्वार आहे.

**■ युरोपीय आयात – वस्तू आणि तंत्रज्ञान**

या कराराची बातमी आल्यापासून आता युरोपियन वाइन, चॉकलेट आणि मार्सिडिज स्वस्त होणार अशी चर्चा मध्यमवर्गात आहे. परंतु अशा उपभोगवस्तूच्या आयातीचा करारात उल्लेख दिसत नाही आणि हे योग्य आहे. कारण या वस्तू उच्चभ्रू उपभोगाच्या असल्याने त्याचा भारतीय ग्राहकांसाठी फार महत्त्वाच्या नाहीत, याउलट परदेशी उपभोगवस्तूची आयात खुली न झाल्याने भारतीय उत्पादकांना दिलासाच मिळेल. मात्र भारतातील उत्पादनक्षमता वाढवण्यासाठी लागणारे युरोपियन तंत्रज्ञान, सेमीकंडक्टर, रसायने, वाहनांचे भाग, इत्यादी गोष्टींच्या आयातीवरील शुल्क कमी होणार आहे. युरोपमधून आयात होणारे ऑलिव्ह ऑइल, फळाचे रस, चीज, बेकरीपदार्थ यावरील आयात शुल्क कमी होईल. हे शुल्क टप्प्याटप्प्याने पाच-सात वर्षांत कमी करण्यात येईल. त्यामुळे त्याचा परिणाम तत्काळ किमती कमी होण्यात दिसून येणार नाही.

**■ नियम व अटी लागू**

या आयात निर्यातीबद्दलच्या मुक्त कराराचे वैशिष्ट्य म्हणजे,पारदर्शकतेसाठी उभय देशांसाठी त्यात नियम व अटी दिलेल्या आहेत. कारण व्यापार मुक्त करण्यामध्ये अर्थव्यवस्थेसाठी धोके उद्‍भवू शकतात. आयात बंधनमुक्त आहे म्हणून अतिस्वस्तात आपला माल विकून बाजारपेठ काबीज करू शकतो. त्यामुळे काही अटी या करारात नमूद केल्या आहेत. तसेच पारदर्शकता, परस्पर सामंजस्य टिकवून ठेवण्यासाठी धोरणे दिली आहेत.

**■ कराराचा खरा पैलू**

या करारामुळे होणारा भारताचा खरा लाभ वेगळाच आहे. पहिले म्हणजे, आत्तापर्यंत भारताचा जवळ जवळ ८५% पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय व्यापार हा अमेरिकेवर अवलंबून होता. मग ती उत्पादने असोत, सॉफ्टवेअर सारख्या सेवा असोत किंवा उच्च शिक्षणासाठी जाणारे तरुण असोत. आता मात्र भारताने निश्चितपणे युरोपियन देशांशी करार करून हे अमेरिका किंवा इतर कोणत्याही एकाच देशावर असलेले अवलबित्व संपवण्याचा हेतुपूर्वक प्रयत्न केला आहे.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, हा करार आंतरराष्ट्रीय आर्थिक धोरणातील आमूलाग्र क्रांती दाखवतो. भारताच्या बाबतीत ज्या प्रमाणे अमेरिका आपल्या धोरणाची दिशा बदलेल त्याप्रमाणे इतर युरोपियन आणि पाश्चात्य देश आपले भारतविषयक धोरण ठरवत. आत्तापर्यंतचे भारताचे आंतरराष्ट्रीय आर्थिक धोरण हे प्रतिक्रियात्मक, किंबहुना काहीसे बचावात्मक होते.

आताच्या या करारातून भारताच्या आंतरराष्ट्रीय आर्थिक धोरणातील जागी झालेली अस्मिता आणि भारताची बदललेली प्रतिमा दिसते. याची दखल सर्व जगाने घेतली आहे.

आत्तापर्यंत आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यासपीठावर भारताकडे बघण्याचा दृष्टिकोन जगाची बाजारपेठ, जगाला स्वस्त कामगार पुरवणारा देश 'जगाला गरिबी निर्यात' करणारा गरजू देश असा काहीसा होता. आज जगातील अनेक प्रगत देश नवीन आर्थिक समीकरणामुळे गोंधळात पडलेले असताना भारताच्या आत्मविश्वासपूर्ण खेळीकडे आदराने बघत आहेत आणि जाहीरपणे त्याची प्रशंसा करत आहेत. महत्त्वाची गोष्ट म्हणजे आरोप-प्रत्यारोप आणि समाज-माध्यमांमधून केलेल्या बेजबाबदार वक्तव्यांनी आशंकित झालेल्या सध्याच्या जागतिक आर्थिक वातावरणात ही 'मदर ऑफ ऑल डील्स' ची घोषणा भारतासाठी आणि इतरांसाठीही एक चांगली ऊर्जा निर्माण करते आहे. जागतिक अस्थिरतेच्या इष्टापत्तीतून मार्ग काढून चातुर्याने केलेला हा करार भविष्यात भारताच्या हातात जागतिक अर्थव्यवस्थेचे सुकाणू येण्यासाठी उचलेले पहिले पाऊल ठरू शकतो.

**(लेखिका पुण्याच्या गोखले इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्समध्ये कार्यरत आहेत.)**

सं वा द